| | |
|---|---|
| MHYA100019042021 | दाखल दिनांकः १३.११.२०२१<br>नोंदणी दिनांकः १३.११.२०२१<br>पारीत दिनांकः ०५.०६. २०२६<br>कालावधीः ०४ वर्षे,०६ महिने,२३दिवस |

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्रमांक २ केळापुर, यांच्या न्यायालयात

**{पिठासीन अधिकारी श्रीमती. सायमा एन.ए.एस. शेख }**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ११०९/२०२१** **नि.क्र. १८**

**महाराष्ट्र सरकार,**
निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क,
पांढरकवडा, ता. केळापुर जि.यवतमाळ

.....**अभियोग पक्ष**

**...विरुध्द...**

**कुणाल शाम मडगुलवार,**
वय ३२ वर्षे, व्यवसायः मजुरी
रा. ढोकी ता. केळापुर जि. यवतमाळ

..... **आरोपी**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ च्या कलम ६५ (ई) अंतर्गत खटला**

..............................................................................

सरकारतर्फे– श्री. एस.बी.जगताप, सहायक सरकारी अभियोक्ता
आरोपीतर्फे– श्री. व्ही.ए.सरोदे, वकील साहेब

..............................................................................

## न्यायनिर्णय

(पारीत दिनांक ०५.०६.२०२६ )

प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये ठेवण्यात आलेल्या आरोपाकरीता चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन–**

२. दिनांक ०५/०७/२०२१ रोजी फिर्यादी पी.जी.मसराम सहकारींसोबत ता. केळापुर परिसरात पेट्रोलिंग करत असतांना त्यांना गुप्त माहीती मिळाली की, ढोकी येथे एक ईसम अवैध्य रित्या दारु विक्री करीत आहे. त्यावरुण आरोपी नामे कुणाल शाम मडगुलवार यांचे राहते घरी पाहणी करुण विचारपूस केली असता, १८० मीली क्षमतेच्या २७ देशी दारुच्या बाटल्या विनापरवाना मिळून आली. त्यावरुन सदरचा माल पंचासमक्ष जप्त करुन त्यापैकी प्रत्येकी एक १८० मि.ली. क्षमतेची बाटली सि.ए. तपासणी करीता नमुना वेगळा काढून जप्तीपंचनामा करण्यात आला. त्यावरुन फिर्यादी यांनी त्याच दिवशी आरोपीविरुध्द फिर्याद नोंदविली.

३. सदर फिर्यादवरुन तपासी अमलदारांनी निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क पांढरकवडा , जि. यवतमाळ येथे आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा क्रमांक ८४/२०२१ नुसार गुन्हा नोंद केला. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनामा, जप्ती पत्रक तयार केले व आरोपीस अटक करुन अटक पंचनामा तयार केला व आरोपीस सुचनपत्रावर सोडले. तपासाअंती आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये गन्हयाचे प्रतिकथन निशानी क्र.१५ अन्वये निश्चीत करुन वाचून दाखविण्यात आले. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे प्रतिकथन केले व त्यांचेवर फौजदारी संपरीक्षा चालविण्याची विनंती केली. अभियोगपक्षातर्फे केवळ एका साक्षीदाराचा पुरावा नोंदविण्यात आला. अभियोगपक्षाच्या पुराव्यातून आरोपीविरुध्द कुठलीही बाब न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

५. अभियोगपक्षाचा पुरावा बघता, प्रकरणाच्या न्यायनिर्णयाकरीता माझ्या समक्ष

खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थीत झाले असून त्यांचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेतः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सरकारपक्षाने असे सिध्द केले काय की, दिनांक ०५/०७/२०२१ रोजी ०८:१० वाजताच्या दरम्यान मौजा ढोकी येथे आरोपीने त्याच्या राहत्या घरी १८० मीली क्षमतेच्या २७ देशी दारुच्या बाटल्या विनापरवाना बाळगतांना व विक्री करीत असतांना आढळून आला. त्यामुळे आरोपीने महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम च्या कलम ६५ (ई) अंतर्गत शिक्षापात्र अपराध केला का? | नकारार्थी |
| २. | काय आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली |

**कारणमिमांसा**

६. आरोपीविरुध्द आरोप साबित करण्याकरीता सरकारी पक्षातर्फे पुरावा सादर करण्यात आला. मौखिक पुराव्यामध्ये पंच साक्षीदार क्र. १ अनिल काळुराम माने यांना सरकारी पक्षाने तपासले.

७. सहायक सरकारी अभियोक्ता श्री. एस.बी. जगताप व आरोपीतर्फे वकील श्री व्ही.ए.सरोदे यांचा युक्तीवाद ऐकला. साक्षपुरावा व अभिलेखाचे अवलोकन केले.

**<u>मुद्दा क्रमांक १ व २ करीताः</u>**–

८. आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्याकरीता सरकार पक्षाने साक्षीदार क्र.१ अनिल काळुराम माने याला जप्ती पंचनाम्यातील पंच म्हणून तपासण्यात आले. सदर पंचसाक्षीदाराने, दिनांक ०५.०७.२०२१ रोजी राज्य उत्पादन शुल्क पोलीसांनी त्यांना सुचनापत्र दिले नव्हते तसेच पंचनाम्याकरीता कुठेही बोलाविले नव्हते, पोलीसांनी त्याचे

समक्ष काहीही जप्त केले नाही असे कथन केले. सदर पंचाने जप्ती पंचनाम्यातील सही व्यतीरीक्त ईतर मजकूर माहीती नसल्याबाबत सांगीतले. सरकारी वकीलांनी घेतलेल्या उलटतपासात त्यांनी अभियोग पक्षाच्या कथनास कोणत्याही प्रकारे समर्थन केले नाही.

९. सदरच्या प्रकरणात सरकारी पक्षाने रासायनिक परिक्षणाचा अहवाल अभिलेखावर आज पर्यंत दाखल केलेला नाही. तसेच एका पंच साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहकार्य न केल्याने आरोपीच्या ताब्यातून नमुद मुद्देमाल जप्ती झाल्याचे सिध्द झाले नाही. त्याच्या परिणामी स्वरूप अभियोग पक्ष हा जप्ती पंचनामा सिध्द करण्यात असफल झाला. करीता घटनेच्या वेळी आरोपी हा त्याच्या २७ देशी दारुच्या बाटल्या विनापरवाना बाळगतांना व विक्री करीत असतांना मिळून आला. असे सरकारपक्ष सिध्द करु शकले नाही.

१०. एकंदरीत अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आरोपीकडील जप्त मुददेमालासंबंधी केलेला जप्ती पंचनामा सरकारी पक्ष साबित करू शकला नाही. त्यामुळे सदर जप्ती पंचनाम्यावर संशय निर्माण होतो आणि घटनेच्या वेळी आरोपीच्या ताब्यातून वर नमुद मुददेमाल मिळून आला या बाबीवरच संशय निर्माण होतो.

११. सरकारी पक्षाने तपासलेल्या एका पंचानी सरकारी पक्षास सहकार्य केले नाही. सरकारी पक्ष जप्ती पंचनामा सिध्द करण्यास विफल झालेला आहे. सरकारी पक्षाने प्रथम खबरी अहवाल सुध्द सिध्द केला नाही. सर्व परिस्थीतीचे एकंदरीत विवेचन केले असता असे दिसून येते की अभियोग पक्ष हा आरोपीविरुध्द गुन्हा संशयाच्या पलीकडे जावुन सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. त्यामुळ आरोपी ही प्रस्तुत खटल्यातून निर्दोष मुक्त होण्यास प्राप्त असल्याचे निष्कर्षाप्रती मी येवून पोहोचली आहे.

करीता मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदवून, मुद्दा क्रमांक २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहेः–

## आदेश

१ आरोपी **कुणाल शाम मडगुलवार** यांना महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ च्या कलम ६५ (ई) अंतर्गतच्या गुन्हयातून कलम २५५(१) फौजदारी प्रक्रीया संहिता,

१९७३ अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२ आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३ आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम ४३७ अ च्या पुर्ततेकरीला आरोपीकडुण वैयक्तील बंधंदपत्र स्विकारुण पुर्तता करण्यात आली.

४ जप्त मुददेमाल अपील कालावधी नंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग, यवतमाळ यांचेकडे पुढील विल्हेवाटीकरीता पाठविण्यात यावे. तसेच काचेचे ग्लास व प्लॅस्टीक मग्गा हे मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधी नंतर नष्ट करण्यात यावे.

५ न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित.

स्वा/–

केळापुर
दिनांक ०५.०६.२०२६

(सायमा एन.ए.एस .शेख )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
(न्यायालय क्रं.२), केळापुर.